| MHBI150014102017 | **नियमीत फौजदारी खटला क्रमांक १०७/२०१७ मधील निशाणी क्र.५३ खालील आदेश** |
|---|---|

[०१] प्रस्तुत अर्ज आरोपीतांनी निशाणी क्र.५० वरील आदेशाप्रमाणे रक्कम रुपये ९००/– न्यायालयात भरण्याच्या मागणीसह सादर केलेला आहे.

[०२] अर्जाच्या पाठीमागील पानावर म्हणणे सादर करत, विद्वान सरकारी वकिलांनी अर्जास तीव्र आक्षेप नोंदविला.

[०३] अर्जाचे, त्यावरील म्हणण्याचे आणि अभिलेखाचे अवलोकन केले.

[०४] दोन्ही बाजुच्या विद्वान वकिलांचा युक्तिवाद ऐकला.

[०५] अर्जाची गुणवत्ता किंवा इतरत्र तपासण्यापूर्वी अभिलेखाचे काळजीपुर्वक अवलोकन करणे गरजेचे ठरते. प्रस्तुत खटल्यातील दोषारोपपत्र दिनांक २९/१२/२०१७ रोजी पाटोदा पोलिसांनी आरोपीतांनी भारतीय दंड विधान, कलम ३२४, ३२३, ५०४, ५०६ सह कलम ३४ अन्वये गुन्हा केल्याच्या आरोपानुषंगे सादर केलेले आहे. त्याप्रमाणे आरोपी हजर झाल्यानंतर दिनांक २८/०३/२०१९ रोजी त्यांच्याविरुध्द निशाणी क्र.३८ वर दोषारोप निश्चीत करण्यात आले. तद्नंतर काढलेल्या साक्षी अधिपत्रानुषंगे दिनांक १२/०६/२०१९ रोजी न्यायालयात साक्षीदार क्र.१ हनुमंत अर्जुन निर्मळ, साक्षीदार क्र.२ अर्जुन नागु निर्मळ आणि साक्षीदार क्र.३ विजयाबाई अर्जुन निर्मळ हे हजर होते. मात्र आरोपींच्या वतीने निशाणी क्र.४३ वर अर्ज सादर केला. त्याप्रमाणे त्यांना मुदत देण्यात आली होती. तद्नंतर दिनांक १२/०७/२०१९ रोजी वरनमुद तीन्ही साक्षीदार हजर होते. सदर दिवशी त्या

तिघांचा पुरावा नोंदविण्यात आला. मात्र आरोपींचे विद्वान वकिल गैरहजर असल्यामुळे आणि आरोपींनी साक्षीदारांचा उलटतपास घेण्यास नकार दिल्यामुळे त्यांच्या उलटतपासाशिवाय प्रकरण पुढे चालविण्याचा आदेश पारीत करण्यात आला.

[०६] वरनमुद पार्श्वभुमीच्या प्रकाशात दिनांक ०३/१०/२०१९ रोजी आरोपींच्या वतीने निशाणी क्र.५० वर फौजदारी प्रक्रिया संहिता, कलम ३११ प्रमाणे अर्ज सादर करण्यात आला. त्याच दिवशीच्या आदेशान्वये सदर अर्ज आरोपींनी पुढील तारखेपावेतो म्हणजेच दिनांक १७/१०/२०१९ रोजी पावेतो न्यायालयात साक्षीदारांच्या भत्त्याची प्रत्येकी रुपये ३००/- म्हणजेच एकुण रुपये ९००/- जमा करण्याच्या अटीवर मंजुर करण्यात आला. मात्र आरोपींनी दिनांक १७/१०/२०१९ रोजी साक्षी भत्त्याची रक्कम जमा न केल्यामुळे, निशाणी क्र.५० वरील आदेशात नमुद केल्याप्रमाणे तो आपोआप नामंजुर झाला. त्यामुळे आरोपींनी आज रोजी वरनमुद मागणीसह प्रस्तुत अर्ज सादर केलेला आहे.

[०७] निशाणी क्र.५० वरील अर्जाची पुर्तता करण्यात आरोपींनी कसुर केल्यामुळे तो अर्ज आपोआप नामंजुर झालेला असल्यामुळे, त्यांना प्रस्तुत अर्जात केलेल्या मागणीप्रमाणे परत रक्कम रुपये ९००/- न्यायालयात भरण्याची परवानगी देता येणार नाही. तसेच या न्यायालयास फौजदारी प्रक्रिया संहितेने पुनर्विलोकनाचे अधिकार नसल्यामुळे प्रस्तुत अर्ज नामंजुर करणे न्यायोचित होईल. एकुणच वरनमुद कारणांचा आणि अभिलेखाचा विचार करता, खालील आदेश पारीत करण्यात येत आहे.

## <u>आदेश</u>

**[०१]** निशाणी क्र.५३ वरील अर्ज नामंजूर करण्यात येत आहे.

**[०२]** आज रोजी न्यायालयात हजर असलेल्या आरोपींनी व त्यांच्या विद्वान वकिलांनी आदेशाची नोंद घ्यावी.

दिनांक – १३.०२.२०२०.

( पंकज म. बिदादा )
प्रथमवर्ग, न्यायदंडाधिकारी, पाटोदा.

# C E R T I F I C A T E

I affirm that the contents of this PDF file Order / Judgment are same word to word, as per the original Order / Judgment.

This order is typed and uploaded by Presiding Officer of this Court.

| | |
|---|---|
| Name of the Court | : J.M.F. C., Patoda. |
| Judgment / Order signed by the P. O. on | : 12.02.2020 |
| Judgment / Order uploaded on | : 12.02.2020 |